# ५. इतर विभाग
## अ ) बाजार समिती विभाग

दि. ३१/०३/२०१४ अखेर महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यांमध्ये ३०५ बाजार समित्यां व ६०३ उपबाजार कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील कार्यरत असणाऱ्या बाजार समित्यांची विभागनिहाय संख्या खाली दर्शविल्याप्रमाणे आहे ;

| अ.क्र. | विभाग | मुख्य बाजार | उप बाजार |
|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | २० | ४२ |
| २. | नाशिक | ३८ | ८९ |
| ३. | पुणे | ३८ | १०३ |
| ४. | औरंगाबाद | २९ | ६३ |
| ५. | लातूर | ५६ | ८५ |
| ६. | अमरावती | ५५ | ९३ |
| ७. | नागपूर | ४८ | ७१ |
| ८. | कोल्हापूर | २१ | ५७ |
| | **एकूण** | **३०५** | **६०३** |

### १. अंशदान -

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियमन, १९६३ चे कलम ३७(२) अन्वये अहवाल वर्षात महाराष्ट्रातील एकूण ३०५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पन्नावर अंशदान आकारणी करण्यात आली.

**(रु. लाखात)**

| दि.३१/०३/२०१३ अखेर थकित रु. | सन २०१२-१३ ची अंशदान मागणी रु. | एकूण वसूलपात्र रक्कम रु. | वसूल रक्कम रु. | येणेबाकी रु. |
|---|---|---|---|---|
| ३५०.४४ | ३००८.८६ | ३३५९.३० | २७२५.०५ | ६३४.२५ |

### २. कर्ज -

**विकासात्मक कर्ज :-** कृषि पणन मंडळामार्फत बाजार समित्यांना त्यांचे मुख्य व दुय्यम बाजार आवारातील विविध विकास कामे करण्यासाठी अंतरिम व दिर्घ मुदतीची कर्जे (अर्थसहाय्य) मंजूर केली जातात. यामध्ये प्रामुख्याने जमिन संपादन, अंतर्गत रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय, लिलाव ओटे, लिलाव ओट्यांवर आवश्यकतेप्रमाणे शेड उभारणे, लिलावगृह, कंपाऊंड वॉल, गेट व वॉचमन केबिन, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, आडत व्यापारी गाळे तसेच कमर्शियल शॉपिंग कॉम्प्लेक्स (व्यापारी गाळे) इ. बांधकामाचा समावेश होतो.

अहवाल वर्षात एकूण ७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांना / संस्थांना विविध विकासात्मक कामे करण्यासाठी एकूण रक्कम रु.१,५२,६७,१७७/- इतके कर्ज वितरित करण्यात आलेले आहे.

## १) मुदती (तिमाही) कर्ज -

| अ. क्र. | बाजार समिती/संस्थेचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | सावली, जि. चंद्रपूर | ८/०४/२०१३ | २७८७००० | (१ ला हप्ता) मु.बा.येथे RKVY अंतर्गत आडत गाळे व विविध विकास कामे (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| २ | आष्टी, जि. वर्धा | १९/०६/२०१३ | १७४५७६१ | (१ ला हप्ता)मु.बा.येथे लिलाव ओट्यावरील शेड व दोन ओट्यामधील क्राँक्रीटीकरण (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| ३ | लोणंद, जि. सातारा | ३०/७/२०१३ | ९३३००० | (१ ला व अंतिम हप्ता) मुख्य बाजार आवारामध्ये शेळी मेंढी शेड (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| ४ | पोंभुर्णा, जि. चंद्रपुर | १/१०/२०१३ | १७८६६४३ | (१ ला व अंतिम हप्ता) मु.बा.येथे RKVY अंतर्गत विविध विकास कामे (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| ५ | पारशिवनी, जि. नागपुर | २२/१०/२०१३ | ११०१४६९ | (२ रा हप्ता) मुख्य बाजार आवारात एक लिलाव ओटा व कंम्पाऊंड वॉल (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| ६ | वसमतनगर, जि. हिंगोली | १५/०१/२०१४ | २०००००० | (४ था व अंतिम हप्ता) ऑक्शन टिनशेड व बाजुचे रस्ते (मुदत १० वर्षे, व्याजदर ८ टक्के) |
| ७ | आष्टी, जि. वर्धा | २४/०२/२०१४ | १९८३८९५ | (२ रा हप्ता)मु.बा.येथे लिलाव ओट्यावरील शेड व दोन ओट्यामधील क्राँक्रीटीकरण (मुदत १० वर्षे (४० तिमाही), व्याजदर ८ टक्के ) |
| | **एकुण मुदती कर्ज वाटप** | | **१२३३७७६८** | |

## २) अंतरीम कर्ज –

| अ. क्र. | बाजार समिती/संस्थेचे नाव | दिनांक | कर्ज रक्कम रु. | कर्जाचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | घनसावंगी, जि. जालना | १८/०४/२०१३ | १०००००० | (३ रा हप्ता) मु.बा. आवार कुंभार पिंपळगांव येथे १२ व उपबाजार घनसावंगी १२ व्यापारी गाळे (मुदत १ वर्षे, व्याजदर १० टक्के ) मुदतीनंतर १२ टक्के |
| २ | आष्टी, जि. वर्धा | १९/०६/२०१३ | १३००००० | (१ ला हप्ता) उप बाजार कारंजा (घा.) येथे ट्रेडर्स शॉप्स (मुदत १ वर्षे,व्याजदर १० टक्के ) |
| | | २८/०२/२०१४ | ६२९४०९ | (२ रा हप्ता) -----॥----- |
| | **एकुण अंतरिम कर्ज वाटप** | | **५१६२१७०** | |
| | **एकुण कर्ज वाटप (मुदती + अंतरिम)** | | **१५२६७१७७** | |

## ३. अर्थसंकल्प मंजूरी –

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ यातील कलम ३८ आणि त्याखालील नियमातील संबंधित नियमान्वये अहवाल वर्षात ३०१ बाजार समित्यांचे मूळ अर्थसंकल्पांना मंजूरी देण्यात आली. त्याचप्रमाणे ७८ बाजार समित्यांचे पुरवणी अर्थसंकल्प व ६३ बाजार समित्यांचे पुर्नविनियोजन पत्रके मंजूर/नामंजुर करण्यात आले.

## ४. कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रात शेतमाल थेट खरेदीबाबत -

महाराष्ट्र शासनाकडील दि.५ जानेवारी २००४ चे आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त अधिनियमातील कलम ७ मधून सूट देऊन महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून संबंधीत बाजार समित्यांच्या आवाराबाहेर शेतमालाची थेट खरेदी करण्यासाठी काही अटींस अधीन राहून शासनाने मान्यता दिलेली आहे. अहवाल वर्षाअखेर ८९ कंपन्यांना थेट खरेदीचे परवाने देण्यात आले आहेत आणि २४ खाजगी बाजार परवाने देण्यात आले आहेत. त्यानुसार कंपन्यांकडून शेतमालाची मोठ्याप्रमाणात खरेदी चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळण्यास मदत होत आहे.